Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# होय; उलटे वेळापत्रक

22 Jul 2011, 0148 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

कोणत्याही उद्योग व्यवसायात 'मनुष्यबळ' हे सर्वात महत्त्वाचे असते. उत्तम कार्यक्षम माणसे मिळवणे आणि त्यांच्या का र्यक्षमतेचा वापर आपल्या व्यवसायाच्या वाढीसाठी करून घेणे यावरच कोणत्याही व्यवसायाचे यशापयश अवलंबून असते.

ही वाक्ये आहेत समर्थ रामदासांनी संभाजी महाराजांना लिहिलेल्या पत्रातील. आधुनिक व्यवस्थापन शास्त्रातील, ह्यूमन रिसोर्स मॅनेजमेंटशी समर्थांचे विचार मिळते जुळते आहेत. उद्योग व्यवसायातच नव्हे तर कोणत्याही सामाजिक, कौटुंबिक, सांस्कृतिक उपक्रमातही मनुष्यबळ महत्त्वाचे असते. आता हे मनुष्यबळ कसे आणि कुठून मिळवायचे? तर समर्थ सांगतात, लोक बहुत शोधावे! त्यांचे अधिकार जाणावे। जाण जाणोन धरावे। जवळ दुरी।।

आपल्या कार्यसिद्धीसाठी ठिकठिकाणाहून लोक शोधावेत, ते शोधताना त्यांची योग्यता, क्षमता, पात्रता जाणून घ्यावी आणि त्याप्रमाणे त्यातील कोणाला किती जवळ करायचे, किती दूर ठेवायचे हे ठरवावे. अशा प्रकारे लोक गोळा केल्यानंतर समर्थ सांगतात, अधिकार पाहोन कार्य सांगणे। साक्षेप पाहोनी विश्वास धरणे। आपला मगज राखणे। काहीतरी।।

समर्थांच्या या वचनाचा अनुभव मी तुळापूरच्या श्री संगमेश्वराच्या जीणोर्द्धाराच्या वेळी घेतला. माझे वडिल कै. राजाभाऊ निरगुडकर यांच्या इच्छेनुसार मी आणि माझी पत्नी चारूशीला हिने तुळापूरच्या प्राचीन संगमेश्वराच्या मंदिराचा कायापालट करायचा निश्चय केला. तुळापूरला भिमा, इंदायणी आणि गुप्त रूपातली भामा या नद्यांच्या त्रिवेणी संगमावर असलेले संगमेश्वराचे यादवपूर्वकालीन मंदिर आहे. सन १६३३मध्ये राव जगदेव मुराराव याने या मंदिराचा जीणोर्द्धार केला, तेव्हा शहाजी महाराज जिजाबाई आणि बालशिवाजी उपस्थित होते! त्यानंतर कालौघात या मंदिराला जीर्णावस्था आली. या प्राचीन, पवित्र वास्तूचा जीणोर्द्धार करायचा म्हणजे विविध प्रकारच्या कुशल-अकुशल कामगारांची गरज होती. या कामगारांकडून वेळेत, अचूक काम करून घेणे महत्त्वाचे होते.

हा सगळा प्रकल्प योग्य प्रकारे पूर्ण करण्यासाठी आम्ही त्याचं उलट टाइमटेबल तयार केलं, म्हणजे मंदिराचा जीणोर्द्धार पूर्ण होऊन त्याचा अर्पण सोहोळा कधी करायचा त्याचा मुहुर्त निश्चित केला आणि त्याप्रमाणे कामाचे वेळापत्रक आखले.

या मंदिराविषयी एक दंतकथा प्रचलित होती, या मंदिराचे काम सुरू करणाऱ्याला काहीतरी त्रास होतो आणि काम बंद पडते. आमच्या कामगारांतही कोणाचा अचानक हात सुजला, कोणाला चक्कर येऊ लागली. पण आम्ही विचलित न होता ठरवल्याप्रमाणे २६ मार्च १९९३ रोजी काम सुरू करून ऑक्टोबरमध्ये काम पूर्ण केले. त्यानंतर ७ नोव्हेंबर रोजी या समारंभाचा सांगता सोहोळा केला.

श्री संगमेश्वराचा कायापालट म्हणजे एक शिवधनुष्यच होते. ते आम्हाला नीट उचलता आले; कारण मानवी संपदेचं योग्य व्यवस्थापन आणि कामाचं अचूक नियोजन. समर्थांच्या उक्तीप्रमाणे बहुत लोक मेळवावे। येक विचार भरावे।। असे करून लोक जोडल्यामुळेच हे काम आम्हाला ठरवलेल्या वेळेत यशस्वी करता आले.

- डॉ. सुधीर निरगुडकर

Network Access Message: The page

Tweet या बातमीला ट्विट करा

**या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी** इथे क्लिक करा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

Powered by Indiatimes

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap

Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service

This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768